# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र ११६ दिनांक- २९/०४/२०२१

## वाहन चोरी करणाऱ्या आरोपीला विरार पोलीसांनी केले गजाआड.

दिनांक १४/०३/२०२१ रोजी ११:३० वा. च्या सुमारास विरार पोलीस ठाणे हद्दीतील ९० फिट रोड, डी मार्टचे पुढे, झाडे विक्रीच्या दुकानाजवळ, मनवेलपाडा, विरार पुर्व येथुन फिर्यादी यांची ४९,०००/- रुपये किंमतीची सफेद व निळया रंगाची होंडा कंपनीची डीओ मोटार सायकल क्र.-एम.एच.-४८-ए.एच.-४५११ ही अनोळखी आरोपीने चोरी करून नेल्याबाबत **विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. २१४/२०२१, भा.द.वि.सं. कलम ३७९** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वाहन चोरींच्या गुन्हयांची मा. वरिष्ठांनी गंभीर दखल घेऊन,गुन्हे ऊघडकीस आणण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे आरोपीची गुन्हे करण्याची कार्यपध्दती, तांत्रिक विश्लेषण आणि बातमीदाराने दिलेल्या माहितीवरुन सर्वेश लालजी गुप्ता, वय १९ वर्षे, रा. ००२, सुहास अपार्टमेंट, रिक्षा स्टॅंडजवळ, विराट नगर, विरार पश्चिम या आरोपीला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या तपासादरम्यान त्याचा गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्याला अटक करण्यात आली.

आरोपी अटके दरम्यान करण्यात आलेल्या तांत्रिक तपासामध्ये नमुद गुन्ह्याव्यतिरीक्त त्याचा इतर खालील नमुद दाखल गुन्हयात सहभाग असल्याने एकुण ०६ वाहन चोरीच्या गुन्ह्यातील २,०९,०००/- रू. कि. च्या ०६ मोटार सायकल आरोपीकडून हस्तगत करण्यात आल्या आहे.

| अ.क्र | तपशिल |
|---|---|
| १ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. २१४/२०२१, भा.द.वि.सं. कलम ३७९ |
| २ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ३४१/२०२१, भा.द.वि.सं. कलम ३७९ |
| ३ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. २९७/२०२१, भा.द.वि.सं. कलम ३७९ |
| ४ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. १३४१/२०१८, भा.द.वि.सं. कलम ३७९ |
| ५ | नालासोपारा पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ३३/२०२०, भा.द.वि.सं. कलम ३७९ |
| ६ | माणिकपुर पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. २५/२०२१, भा.द.वि.सं. कलम ३७९ |

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-३ श्रीमती रेणुका बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त,विरार विभाग,यांचे मार्गदर्शनाखाली, श्री.विवेक सोनवणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. प्रफुल वाघ, पोलीस निरीक्षक (प्रशासन), गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलीस उप निरीक्षक अभिजीत भुपेंद्र टेलर,संदेश राणे, पो.हवा. सचिन लोखंडे, पो.ना. सचिन घेरे, विजय दुबळा, जगदिश मराठे, हर्षद चव्हाण, भुषण वाघमारे, संदिप शेरमाळे, पो.शि. इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, सुमित जाधव, रवी वानखेडे, सुनिल पाटील, पवन पवार यांनी केली आहे.

Scanned with CamScanner